CNR-MHBU11-000604-2021

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २०/०८/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : | २०/०८/२०१९ |
| निकाल दिनांक | : | ०८/०४/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>०६ ०७ १९ |

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांच्या न्यायालयात**

**(सदस्य :– पुरुषोत्तम भा. जाधव.)**

**<u>मोटार अपघात दावा क्र. २१८/२०२१</u>** **<u>निशाणी क्र. ४७</u>**

(जुना मो.अप. दावा क्र. १६०/२०१९)

१) **तेजस गजानन खडसे,**
वय अंदाजे १८ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,

२) **कांचन गजानन खडसे,**
वय अंदाजे २० महिने, व्यवसाय – शिक्षण,

३) **गजानन विनायक खडसे (मयत),**

४) **विनायक नामदेव खडसे (मयत),**

सर्व राहणार अनुराबाद, तालुका मलकापूर,
जिल्हा बुलढाणा.

**... अर्जदार/ दावेदार.**

**–विरुध्द–**

१) **मे. सोलर इंडस्ट्रीज इंडीया लि.,**
पत्ता – चाकडोह खुर्द, नं. ३७/३९, ७८–८३,
अमरावती रोड, पो. बाजारगांव, तालुका काटोल,
जिल्हा नागपूर.

**... सामनेवाला.**

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

२) **युनायटेड इंडीया इन्शोरन्स कंपनी,**
पत्ता – 'माईया', पहिला मजला, डी.के. मंगल कार्यालयाजवळ, खामगांव, तालुका खामगांव, जिल्हा बुलढाणा. } **... सामनेवाला.**

---

| | | |
|---|---|---|
| **अर्जदारांतर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. के.व्ही. परमार.** |
| **सामनेवाला क्र. १ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. एम.एस. पाटील.** |
| **सामनेवाला क्र. २ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. डी.एस. चव्हाण.** |

---

## न्यायनिर्णय

**(पारीत दिनांक – ०८ एप्रिल, २०२६)**

मृतक छाया गजानन खडसे यांचा मुलगा, मुलगी आणि सासू-सासरे यांनी मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १६६ अन्वये मोटार अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

२) सदरचे प्रकरण प्रलंबित असताना मृतक छाया हिचे पती व सासरे मृत्यू पावल्याने त्यांचे नाव प्रकरणातून कमी करण्यात आले.

**अर्जदारांचे प्रकरण थोडक्यात येणेप्रमाणे –**

३) तारीख २०/०५/२०१९ रोजी दुपारी ०२:२० वाजेच्या सुमारास

मृतक छाया आणि इतर महिंद्रा मॅक्सिमो वाहन क्र. एमएच ४६ – एक्स ७९२५ ने प्रवास करत असताना सदरचे वाहन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरून रसोया फॅक्टरीजवळ पोहोचले असता, समोरून येणारे कंटेनर वाहन क्र. एमएच ४० – बीजी ९११२ च्या चालकाने सदरचे कंटेनर वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रस्त्याचा परिस्थितीचा विचार न करता चालवून सदर मॅक्सिमो वाहनास समोरून धडक दिली. सदर अपघातात मृतक छायासह इतर काही प्रवासी मृत्यू पावले तर काही प्रवासी जखमी झाले. सदर अपघाताबाबत पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश पवार यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन मलकापूर शहर येथे कंटेनरचे चालक श्री. कैलास जाधव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये अपराध क्र. २४०/२०१९दाखल करण्यात आला. सामनेवाला क्र. १ सदर कंटेनरचे मालक असून सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत आहे, त्यामुळे अर्जदार सामनेवाल्यांकडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

४) अर्जदारांचे पुढे असेही प्रकरण आहे की, मृतक छाया हिचेवर सर्व अर्जदार अवलंबित होते. तिचे वय ३९ वर्ष होते. ती महिलांचे कपडे शिवून दररोज रुपये ३००/– म्हणजेच महिन्याला रुपये ९,०००/– कमवत होती. तिचे उत्पन्न भविष्यात वाढले असते. अर्जदारांनी एकूण रक्कम रुपये १०,००,०००/– च्या नुकसान भरपाईचे मागणी केलेली आहे.

५) कंटेनर वाहनाचे मालक सामनेवाला क्र. १ यांनी निशाणी क्र. १३

वर आपला लेखी जबाब देऊन अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी प्रथमतः अर्जातील सर्व मजकूर नाकबूल केला आहे. त्यांनी त्यांच्या अधिकच्या जबाबात असे नमूद केले आहे की, सामनेवाला क्र. १ सदर कंटेनरचा मालक असून सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत केलेले केलेले होते. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचे ठरविल्यास ती अदा करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. २ यांची आहे. त्यांचे पुढे असेही म्हणणे आहे की, कंटेनरचा चालक सदरचे वाहन संतुलित वेगाने व मोटार वाहन नियमांचे पालन करून चालवत होता व अपघातात कंटेनर चालकाचे कोणतीही चूक नव्हती. उलट पक्षी मॅक्सिमो वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने वाहन चालवल्याने अपघात झालेला आहे. त्यामुळे सामनेवाला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही. गुन्हा दाखल झाल्याचे सुद्धा सामनेवाला क्र. १ यांनी नाकारले आहे. सर्व कारणास्तव त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६) सामनेवाला क्र. २ यांनी सुद्धा निशाणी क्र. १८ वर लेखी जबाब देऊन अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी सुद्धा प्रथमतः अर्जातील सर्व मजकूर नाकबूल केला आहे. मृतक छाया हिचे वय, व्यवसाय, उत्पन्न आणि तिच्यावरील अर्जदारांचे अवलंबित्व सामनेवाला क्र. २ यांनी नाकारले आहे. त्याचप्रमाणे घटनास्थळ पंचनामा याप्रमाणे अपघात रस्त्याच्या मधोमध घडला असल्याने दोन्ही वाहने समोरासमोर धडकेमुळे अपघात झाल्याचे दिसून येत असल्याचे व त्यामुळे सदरचा अपघात मॅक्सिमो वाहनाच्या चालकाच्या चुकीमुळे घडल्याचे

दिसून येत असल्याचे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. मॅक्सिमो वाहनातील प्रवासी यांचे पत्ते पाहता ते वेगवेगळ्या ठिकाणी राहणारे असल्याचे दिसून येते, त्यामुळे मॅक्सिमो वाहन चालक बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक करत होते व सदर अपघातात मॅक्सिमो वाहन चालकाचा सुद्धा मृत्यू झाला आहे.

७) सामनेवाला क्र. २ यांचे असेही म्हणणे आहे की, कंटेनर चालकाकडे वाहन चालवण्याचा वैध परवाना होता आणि सदर वाहनास जड वाहतूक करण्यासाठीचे फिटनेस प्रमाणपत्र होते, हे सामनेवाला क्र. १ यांनी सिद्ध केले पाहिजे. अर्जदारांनी मॅक्सिमो वाहनाचे मालक व विमा कंपनी यांना पक्षकार केले नसल्याने प्रस्तुत प्रकरणास आवश्यक पक्षकार न केल्याचा बाध येत असल्याचे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. या सर्व कारणास्तव सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा आणि दोन्ही वाहनांच्या चालकांच्या दोषामुळे अपघात झाल्याचे सिद्ध झाल्यास सामनेवाला क्र. २ यांच्यावर ५०% नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी ठेवण्यात यावी, असेही सामनेवाला क्र. २ यांच्या म्हणणे आहे.

८) उपरोक्त परिस्थितीत निशाणी क्र.१९ वर खालील प्रमाणे मुद्दे काढण्यात आले असून त्याखाली नमूद कारणांसाठी त्यावर निष्कर्ष नोंदवण्यात येतात, ते येणेप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वाहन क्र. एमएच ४० – बीजी ९११२ हे | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | गुंतलेल्या अपघातात मृतक छाया गजानन खडसे, राहणार अनुराबाद, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांचा मृत्यू झाला, हे अर्जदारांनी सिद्ध केले का? | ... सकारात्मक. |
| २. | सदरचा अपघात मोटार वाहन क्र. एमएच ४०–बीजी ९११२ च्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवल्यामुळे घडला, असे अर्जदाराने सिद्ध केले का? | ... सकारात्मक. |
| ३. | अपघाताच्या दिवशी मयत तिचे वय व उत्पन्न काय होते? | वय ३९ वर्ष, काल्पनिक उत्पन्न रुपये ३००/–प्रतिदिन. |
| ४. | सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत होते का? | ... होय. |
| ५. | विमा पॉलिसीच्या अटी–शर्तींचा भंग झाला आहे असे विमा कंपनीने सिद्ध केले का? | ... नाही. |
| ६. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती आणि नुकसान भरपाई देण्यास कोण जबाबदार आहे? | ... होय, सामनेवाला क्र. २, रक्कम रुपये १२,४४,०००/– |
| ७. | आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमीमांसा

९) अर्जदारांनी अर्जाच्या पुष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ तेजस यांची निशाणी क्र. २६ वर आणि अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून रोहित नथ्थू चौधरी यांची निशाणी क्र. २७ वर साक्ष घेतली असून त्यांनी निशाणी क्र. २८ ते ४४ वरील कागदपत्रांवर भिस्त ठेवली आहे. अधिकचा पुरावा देणे नसल्याबद्दल अर्जदारांनी निशाणी क्र. ४६ वर पुरसीस दाखल केली आहे.

१०) दोन्ही सामनेवाल्यांना वारंवार संधी देऊनही त्यांनी कोणताही पुरावा न दिल्यामुळे प्रकरण त्यांच्या पुराव्याशिवाय चालेल, असा आदेश सामनेवाला क्र. १ विरुद्ध तारीख १८/०२/२०२६ रोजी आणि सामनेवाला क्र. २ विरुद्ध तारीख ११/०३/२०२६ रोजी निशाणी क्र. १ खाली करण्यात आला.

११) अर्जदारांचे विद्वान वकील श्री. के.व्ही. परमार, सामनेवाला क्र. १ चे विद्वान वकील श्री. एम.एस. पाटील आणि सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकील श्री. डी.एस. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले.

**मुद्दा क्र. १ व २ करिता :-**

१२) कंटेनर वाहनाच्या चालकाच्या चुकीमुळे सदर अपघात झाला आणि त्यात मृतक छाया मृत्यू पावली, हे सिद्ध करण्यासाठी अर्जदारांनी दोन साक्षीदार तपासले आहेत. त्यांचा पुरावा प्रथमतः पाहणे आवश्यक आहे.

१३) अर्जातील कथनाप्रमाणेच अर्जदाराचे साक्षीदार क्र. १ म्हणजेच अर्जदार क्र. १ तेजस गजानन खडसे यांनी निशाणी क्र. २६ वर आणि अर्जदाराचे साक्षीदार क्र. २ श्री. रोहित नथ्थू चौधरी यांनी निशाणी क्र. २७ वर पुरावा दिलेला आहे. तारीख २०/०५/२०१९ रोजी दुपारी २:२० वाजेच्या सुमारास मृतक छाया आणि इतर महिंद्रा मॅक्सिमो वाहन क्र. एमएच ४६ – एक्स ७९२५ ने प्रवास करत असताना सदरचे वाहन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरून रसोया फॅक्टरीजवळ पोहोचले असता, समोरून येणारे कंटेनर वाहन क्र. एमएच ४० – बीजी ९११२ च्या चालकाने सदरचे कंटेनर वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रस्त्याचा परिस्थितीचा विचार न करता चालवून सदर मॅक्सिमो वाहनास समोरून धडक दिली. सदर अपघातात मृतक छायासह इतर काही प्रवासी मृत्यू पावले तर काही प्रवासी जखमी झाल्याचे. दोन्ही साक्षीदारांनी आपल्या पुराव्यात नमूद केले आहे.

१४) सदर अपघाताबाबत पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश पवार यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन मलकापूर शहर येथे कंटेनरचे चालक श्री. कैलास जाधव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये अपराध क्र. २४०/२०१८ दाखल करण्यात आल्याचे सुद्धा अर्जदाराच्या दोन्ही साक्षीदारांनी आप–आपल्या पुराव्यात नमूद केले आहे.

१५) अर्जदारांचा साक्षीदार क्र. २ रोहित यांनी आपल्या निशाणी क्र. २७

वरील पुराव्यात असेही नमूद केले आहे की, तारीख २०/०५/२०१९ रोजी ते व त्यांचे वडील नथ्थू चौधरी हे मॅक्सिमो वाहनातून प्रवास करीत होते व त्यांनी सदरचा अपघात प्रत्यक्ष पाहिलेला आहे.

**१६)** सामनेवाला क्र. १ यांनी दोन्ही साक्षदारांची उलट तपासणी घेतलेली नाही. सदरचा अपघात मॅक्सिमो वाहनाच्या चालकाच्या चुकीमुळे झाला असल्याचे दोन्हीही साक्षीदारांनी सामनेवाला क्र. २ यांनी घेतलेल्या उलट तपासणीत नाकबूल केले आहे.

**१७)** अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ रोहित यांनी त्यांचे वय अपघातावेळी १९ वर्षे होते व ते मॅक्सिमो वाहनातून प्रवास करीत होते, या बाबी उलटतपासणीत सुद्धा नमूद केल्या आहेत. त्यांनी अपघाताबाबत पोलीस स्थानकात तक्रार दिली नाही, असे उलटतपासणी कबूल केले आहे. त्यामुळे अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ यांचे वर्तन पाहता त्यांच्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकिलांनी केला. मात्र तो युक्तिवाद योग्य नाही. सदर अपघातात अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ यांचे वडील सुद्धा मृत्यू पावलेले आहेत. त्याचप्रमाणे अनेक प्रवासी मृत्यू पावलेले आहेत व काही जखमी सुद्धा झालेले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदारांच्या साक्षीदार क्र. २ रोहित सुद्धा जखमी झालेले होते. अशा परिस्थितीत त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली नाही, या कारणावरून त्यांची साक्ष नाकारता येणार नाही अथवा त्यांच्या साक्षीवर अविश्वास दाखवता येणार नाही.

१८) साक्षीदार क्र. २ यांचे वडील आणि अजून १ व्यक्ती मॅक्सिमो वाहन चालकाच्या बाजूच्या आसनावर बसले असल्याचे अर्जदाराचे साक्षीदार क्र. २ रोहित यांनी उलटतपासणीत मान्य केले आहे. एकूण तीन व्यक्ती मॅक्सिमो वाहन चालकाच्या आसनाच्या बाजूला असलेल्या आसनावर बसले असल्यामुळे मॅक्सिमो वाहन चालकास सदरचे वाहन चालवण्यास त्रास होत होता व त्यामुळे मॅक्सिमो वाहन चालकाच्या चुकीमुळे अपघात घडला, असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकिलांनी केला. मात्र मॅक्सिमो वाहन चालकास तसा त्रास होत असल्याबद्दलची बाब सदर साक्षीदारांनी स्पष्टरित्या नाकारली आहे.

१९) अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ रोहित या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा संयुक्तिक व विश्वसनीय नसल्याचा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकिलांनी केला. मात्र उपरोक्त चर्चेचा विचार करता व त्याचा संपूर्ण पुरावा पहाता प्रत्यक्षदर्शी साक्षीदार रोहित यांच्या पुराव्यावर अविश्वास दाखवावा किंवा त्यांचा पुरावा संभवनीय नाही असे ठरविण्यास पुराव्यात आणि अभिलेखावर कोणत्याही बाबी आलेल्या नाहीत व तसे म्हणण्यास कोणतेही कारण नाही.

२०) सदर अपघातात दोन वाहनाचा समावेश असून मॅक्सिमो वाहनातील अनेक व्यक्ती मृत्यू पावल्या व अनेक व्यक्ती जखमी झाल्या, या कारणावरून सदर अपघात मॅक्सिमो वाहन चालकाच्या चुकीमुळे झाला, असा निष्कर्ष काढता येणार

नाही. त्यामुळे त्याबद्दलचा सामनेवाला क्र. २ यांच्यातर्फे केलेला युक्तिवाद योग्य नाही.

२१) सदर अपघाताबद्दल सामनेवाले कंटेनर चालकाचे साक्ष घेऊ शकले असते. मात्र ती त्यांनी घेतलेली नाही. त्याचप्रमाणे त्यांची साक्ष घेतली नाही, याचे काही एक कारणही त्यांनी दिलेले नाही. त्याचप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक श्री.शैलेश पवार यांनी अपघाताबद्दल चौकशीअंती मलकापूर शहर पोलीस स्थानकात फिर्याद दिली आहे व त्या फिर्यादीवरून कंटेनर चालक कैलास जाधव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये अपराध क्र. २४०/२०१९ नोंदवण्यात आला आहे. एवढेच नाही तर तपासाअंती सदर वाहन चालकाविरुद्ध दोषारोपपत्र सुद्धा दाखल केले आहे. या बाबी सामनेवाल्यांनी अर्जदारांच्या साक्षीदारांच्या उलट तपासणी आव्हानित केलेल्या नाहीत.

२२) दुसरे असे की, सदर बाबींच्या पृठ्यर्थ अर्जदारांनी अपघाताचा एए फॉर्म (निशाणी क्र. २८), प्रथम खबर (निशाणी क्र. २९), घटनास्थळाचा पंचनामा (निशाणी क्र. ३०), मरणोत्तर पंचनामा (निशाणी क्र. ३१), पोलीस अहवाल (निशाणी क्र. ३२), शवविच्छेदन अहवाल (निशाणी क्र. ३३) आणि अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ रोहित याचा पोलीस जबाब (निशाणी क्र. ४४) हा कागदपत्री पुरावा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे दोषारोप पत्राची प्रत निशाणी

क्र.३८ वर दाखल केली आहे. सदरची कागदपत्रे अर्जदारांच्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्यासह पुष्टी देतात.

२३) तपासी अधिकाऱ्यांनी चुकीचा किंवा खोटा तपास केला, याबाबत सामनेवाला यांनी कोणत्याही बाबी अभिलेखावर आणलेल्या नाहीत. दुरुक्तीचा दोष पत्करून या ठिकाणी असे नमूद करण्यात येते की, सामनेवाला हे कंटेनर चालकाची साक्ष घेऊ शकले असते, मात्र त्यांनी त्याची साक्ष घेतले नाही व ती का घेतली नाही, याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

२४) उपरोक्त परिस्थितीत सदरचा अपघात कंटेनर चालकाने कंटेनर हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवल्यामुळे झाला, हे सिद्ध होते. सदर अपघातात मृतक छाया या मृत्यू पावल्या, याबाबत सामनेवाल्यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. यास्तव मुद्दा क्र. १ व २ अर्जदारांनी सिद्ध केला असल्याने सदर मुद्द्यांवर सकारात्मक निष्कर्ष नोंदवण्यात येतात.

**मुद्दा क्र. ३ ते ७ : –**

२५) मृतक छाया यांचा सामनेवाला क्र. १ यांचे मालकीचे कंटेनर गुंतलेल्या अपघातात मृत्यू झाल्याचे व सदर अपघात कंटेनर चालकाच्या चुकीमुळे घडल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी नुकसान भरपाई किती मिळू शकते, हे ठरवणे आवश्यक आहे. प्रथमतः मृतक छाया यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या

उत्पन्नातील नुकसानी ठरवण्यासाठी त्यांचे उत्पन्न, वय, त्यांची वैवाहिक स्थिती, त्यांच्या उत्पन्नातील भविष्यातील वाढ, त्यांच्यावर अवलंबतांची संख्या इत्यादी बाबी पाहणे आवश्यक आहे.

२६) प्रथमतः मृतक छाया यांच्या उत्पन्नाबाबत पुरावा पाहणे योग्य ठरेल. मृतक छाया या महिलांचे कपडे शिवण्याचे काम करीत होत्या आणि त्यांना दरमहा रुपये ९,०००/— मिळत होते, असे अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ तेजस यांनी निशाणी क्र. २६ वरील त्यांच्या पुराव्यात नमूद केले आहे. मृतक छाया यांच्या उत्पन्नाबाबतची बाब सामनेवाला क्र. २ यांनी त्यांच्या लेखी जबाबात आणि उलटतपासणीत आव्हानित केली आहे. असे असताना अर्जदारांनी सदर उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री अथवा स्वतंत्र तोंडी पुरावा दिलेला नाही. तो का दिला नाही, याबाबत सुद्धा त्यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही. या परिस्थितीत मृतक छाया या शिवणकामाचा व्यवसाय करीत होते हे सिद्ध होत नाही.

२७) मृतक छाया यांचे लग्न झालेले होते, त्यांना अर्जदार क्र. १ व २ हे मुलगा व मुलगी आहे. अशा परिस्थितीत त्या गृहिणी होत्या, हे सिद्ध होते. सबब, त्यांचे उत्पन्न हे नुकसान भरपाईसाठी काल्पनिक उत्पन्न संकल्पनेच्या आधारे ठरवणे आवश्यक आहे. अर्जदारांचे कुटुंब हे ग्रामीण भागात राहणारे आहेत. अपघात सन २०१९ मध्ये झालेला आहे. ग्रामीण भागातील किमान वेतन अधिनियम अन्वये ठरवण्यात आलेला शेतमजुरीचा दर लक्षात घेता त्यांचे उत्पन्न

दररोज रुपये २५०/- ते ३५०/- होते, हे लक्षात घेता मृतक छाया यांचे काल्पनिक उत्पन्न रुपये ३००/— प्रतिदिन या दराने रुपये ९,०००/- प्रतिमहा ठरवणे योग्य व न्यायोचीत होईल. या दराप्रमाणे त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,०८,०००/— होईल.

२८) मृतक छाया यांचे वय ३९ वर्ष असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे अर्जदाराचे साक्षीदार क्र. १ तेजस यांनी त्यांच्या पुराव्यात नमूद केले आहे आणि सदरची बाब सामनेवाल्यांनी उलट तपासणीत आव्हनित केलेली नाही. दुसरे असे की, मृतक छाया यांचा शवविच्छेदन अहवाल (निशाणी ३३) मध्ये त्यांचे वय ३८ वर्ष नमूद केले आहे. याअनुषंगाने अर्जदारांनी दिलेला पुरावा संभवनीय वाटतो व त्यावरून मृतक छाया यांचे वय ३९ वर्ष असल्याचे सिद्ध होते.

२९) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सरला वर्मा –विरुद्ध– दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (२००९ एसीजे १२९८)** या निर्णयानुसार मोटार वाहन नुकसान भरपाई ठरवण्यासाठीचा मृतक छाया यांचे वय ३९ असल्याने गुणांक १५ येतो. या सर्व बाबींचा विचार करता मृतक छाया यांच्या मृत्यूमुळे अर्जदारांचे उत्पन्नाचे नुकसान झाल्याची भरपाई (वार्षिक उत्पन्नाचे नुकसान रक्कम रुपये १,०८,००० X गुणांक १५) रक्कम रुपये १६,२०,०००/— येते.

३०) मृतक छाया हे मजुरी करत असल्याचे गृहीत धरले असल्याने

भविष्यात सुद्धा त्यांच्या मजुरीचे दर वाढले असते. त्यांचे वय ३९ होते, हे लक्षात घेता स्थापित न्यायतत्वाच्या अनुषंगाने त्यांच्या मजुरीत/उत्पन्नात ४०% वाढ झाली असती, हे गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यानुसार त्यांच्या उत्पन्नात भविष्यातील वाढ म्हणून रक्कम रुपये ६,४८,०००/— मिळवणे आवश्यक आहे. सदरची रक्कम मिळवल्यानंतर त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न नुकसान भरपाई रक्कम रुपये २२,६८,०००/– होते.

३१) अर्जदार ही मृत छायाची मुले व सासू–सासरे आहेत, याबाबत वाद नाही. ते मृत छाया यांच्यावर अवलंबून होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदार काही काम करतात, असे सामनेवालांचे म्हणणे नाही व तसाही पुरावा अभिलेखावर नाही. यास्तव अर्जदार क्र. १ ते ४ मृतक छाया यांच्यावर अवलंबून होते, हे सिद्ध होते. मात्र अर्जदार क्र. ३ व ४ हे आता हयात नाहीत. म्हणजेच आता नुकसान भरपाई ठरवण्यासाठी छाया यांच्यावर एकूण २ व्यक्ती अवलंबित होत्या, असे म्हणावे लागेल. मृतक छाया ह्या विवाहित होत्या. या सर्व बाबींचा विचार करता, नुकसान भरपाई ठरवितांना मृतक छाया यांच्या वैयक्तिक खर्चाची रक्कम म्हणून त्यांच्या उत्पन्नातून $^{१}/_{२}$ रक्कम वजा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम वजा करून मृतक छाया यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या झालेल्या उत्पन्नाचे नुकसान भरपाई रक्कम रुपये ११,३४,०००/— येते.

३२) उपरोक्त नुकसान भरपाई व्यतिरिक्त मृतक छाया यांच्या वाहन

अपघातातील मृत्यूमुळे त्यांचे अवलंबित म्हणजे अर्जदारांच्या संपत्तीचे नुकसान (Loss of Estate ) आणि अंतिम संस्काराचा खर्च सुद्धा मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात. या सदरांखाली प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– देण्यात यावे, हे स्थापित न्यायतत्त्व आहे. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड –विरुद्ध– प्रणय सेठी, [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १०% वाढ सदर रकमेत देण्यात यावी असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपघात सन २०१९ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला नाही. म्हणून संपत्तीचे नुकसान आणि अंतिम संस्कार खर्च या सदराखाली प्रत्येकी रुपये १५,०००/– मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात.

**३३)** अर्जदार क्र. १ व २ मृतक छाया यांचे अविवाहित अपत्ये असून अर्जदार क्र. १ व २ यांची माता गमावल्याच्या वियोगामुळे स्थापित न्यायतत्त्वानुसार सदर अर्जदार प्रत्येकी रक्कम रुपये ४०,०००/– नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात.

**३४)** मृतक छाया यांना अपघातानंतर दवाखान्यात दाखल केले होते व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आला होता असे अर्जदारांचे म्हणणे नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचाराचा खर्च मिळण्यास अर्जदार पात्र नाहीत.

**३५)** उपरोक्त नुकसान भरपाईच्या रकमेशिवाय अन्य सदराखाली अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे अर्जदारांचे म्हणणे नाही. उपरोक्त सदराखालील पात्र ठरलेली नुकसान भरपाईची रक्कम येणेप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अपघातात मृत्यू झालेल्या छायाच्या उत्पन्नाची नुकसान भरपाई | रु. | ११,३४,०००/– |
| ब. | संपत्तीचे नुकसान (Loss of estate) | रु. | १५,०००/– |
| क. | अंतिम संस्कार खर्च | रु. | १५,०००/– |
| ड. | अर्जदार क्र. १ व २ यांच्या आईच्या मृत्यू वियोगामुळे नुकसान भरपाई रक्कम प्रत्येकी रुपये ४०,०००/– याप्रमाणे | रु. | ८०,०००/– |
| | **एकूण नुकसान भरपाईची रक्कम (अ+ ब+ क+ ड)** | **रु.** | **१२,४४,०००/–** |

**३६)** येणेप्रमाणे अर्जदार मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. सदर नुकसान भरपाईच्या रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून रक्कम वसूल वसूल होईपावेतो बँक दराने व्याज देणे क्रमप्राप्त ठरते. सध्याचा बँक व्याजदराचा विचार करता वार्षिक सात टक्के दराने व्याज देणे योग्य व वाजवी ठरेल.

**३७)** भविष्यातील उत्पन्न वाढीवर व्याज देता येणार नाही असे

सामनेवाल्यांचे म्हणणे आहे मात्र भविष्यातील उत्पन्न वाढ ही मानिव वाढ धरून नुकसान भरपाई ठरवण्यात येत असल्यामुळे सदरचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक नाही.

३८) प्रकरण २०१९ पासून प्रलंबित असून अर्जदाराने सदर प्रकरण चालवण्यास सकारात्मक पावले उचलली नाहीत, म्हणून संपूर्ण कालावधीसाठी व्याज मंजूर करण्यात येऊ नये असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकील यांनी केला. हे खरे की, प्रस्तुतचे प्रकरण सन २०१९ मध्ये दाखल झाले होते. दरम्यानच्या काळात मलकापूर येथे स्वतंत्र न्यायाधिकरण झाल्याने प्रकरण बुलढाणा येथून मलकापूर येथे वर्ग करण्यात आले. माझे पूर्वपिठासन अधिकारी यांनी तारीख ०९/०३/२०२२ रोजी मुद्दे काढलेत, त्यानंतर प्रकरण पुराव्यासाठी ठेवण्यात आल्यावर तारीख १६/११/२०२२ रोजी अर्जदारांनी सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. सदर प्रकरणी दोन्ही पक्षकारांकडून मुदती घेण्यात आल्या व शेवटी सन २०२६ मध्ये पुरावा पूर्णपणे नोंदविण्यात आला. या परिस्थितीत सदर प्रकरण लांबणीवर पडण्यासाठी अर्जदाराची चूक आहे, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे याप्रकरणी व्याज देऊ नये अशी मागणी सामनेवाल्यांना करता येणार नाही.

३९) अर्जदारांनी नुकसान भरपाईची रक्कम अधिक मागितली असली, तरी न्यायालयीन मुद्रांक मात्र कमी रक्कमेवर दिलेला आहे. मात्र योग्य व वाजवी मोटर

अपघात नुकसान भरपाई ठरवण्याची जबाबदारी मोटार अपघात नुकसान भरपाई न्यायाधिकरण यांच्यावर असल्याने उर्वरित न्यायालयीन मुद्रांक अर्जदारांनी सादर करण्याच्या निर्देशासह नुकसान भरपाई देण्याचा हुकूम करणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

४०) अर्जदारांचे मृतक छाया यांचेशी असलेले नाते, त्यांचे अवलंबित्व व त्यांचे वय लक्षात घेता अर्जदार क्र. १ व २ यांना नुकसान भरपाईपैकी प्रत्येकी ५०% रक्कम देणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. दोन्हीही अर्जदार आता सज्ञान आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई रक्कमेपैकी कोणतीही रक्कम मुदत ठेवीत ठेवण्यात येवू नये, हा अर्जदारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद योग्य वाटतो.

४१) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅन कार्डबद्दल माहिती, ई–मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत देण्याचा हुकूम करणे आवश्यक ठरते.

४२) प्रस्तुतच्या अपघातात मॅक्सिमो वाहन आणि कंटेनर वाहन गुंतलेले आहे. मात्र मॅक्सिमो वाहन मालक आणि विमा कंपनी यांना या अर्जात पक्षकार केले नाही, म्हणून आवश्यक पक्षकार न केल्याचा बाधा या प्रकरणात येतो, असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकिलांनी केला. मात्र तो योग्य नाही.

कारण मुद्दा क्र. १ व २ यांच्यावरील निष्कर्षाच्या अनुषंगाने सदरचा अपघात कंटेनर चालकाच्या भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवण्यामुळे घडला असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आवश्यक पक्षकार न केल्याचा बाधा या प्रकरणास येत नाही.

४३) सदर कंटेनर वाहन सामनेवाला क्र. १ च्या मालकीचे आहे, याबाबत वाद नाही. त्याचप्रमाणे अपघाता वेळी सदरचे कंटेनर वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत होते, याबाबतही वाद नाही. त्याचप्रमाणे विमा पॉलिसी निशाणी क्र. ३५ वर दाखल करण्यात आली आहे.

४४) कंटेनर वाहन चालकाकडे वाहन चालवण्याचा वैध परवाना नव्हता आणि सदर वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र ही नव्हते, त्यामुळे विमा पॉलिसीचे अटी-शर्तींचा भंग झाल्यामुळे सामनेवाला क्र. २ नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरू शकत नाहीत, असा सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला. मात्र अर्जदारांनी कंटेनर वाहन चालकाचा परवाना निशाणी क्र. ३६ वर आणि कंटेनर वाहनाचे वाहन तपशील निशाणी क्र. ३७ वर दाखल केलेले आहेत. त्या कागदपत्रांचा विचार केला असता सदर कंटेनर वाहनास अपघातावेळी फिटनेस प्रमाणपत्र होते आणि कंटेनर वाहन चालकाकडे वैध वाहन चालवण्याचा परवाना होता, या बाबी सिद्ध होत असल्याने सामनेवाला क्र. २ यांचा युक्तिवाद योग्य नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. २ हे कंटेनर वाहनाचे विमा कंपनी म्हणून या कामी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरतात.

४५) याप्रकरणी मॅक्सिमो वाहन गुंतलेले होते व त्या वाहनाच्या मालक किंवा विमा कंपनीकडून अर्जदारांनी नुकसान भरपाई घेतले नाही, असे स्पष्टपणे अर्जात किंवा पुराव्यात अर्जदाराने नमूद केले नाही. त्यामुळे दोन्ही वाहन विमा कंपनीकडून अर्जदार नुकसान भरपाई घेण्याची शक्यता असल्याने प्रस्तुत प्रकरण नामंजूर करण्यात यावे, असा सामनेवाला क्र. २ यांचे वकिलांनी युक्तीवाद केला. मॅक्सिमो वाहन मालक किंवा विमा कंपनी यांच्याकडे नुकसान भरपाई मागितली किंवा काय याचे स्पष्टीकरण अर्जदारांच्या पुराव्यात सामनेवाला मागू शकले असते, मात्र तसा प्रयत्न सामनेवाल्यातर्फे करण्यात आलेला नाही. अर्जदारांनी मॅक्सिमो वाहन यांचे मालक किंवा विमा कंपनी यांच्याकडून नुकसान भरपाई मागितली, याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. अर्जदारांनी मॅक्सिमो वाहन मालक किंवा विमा कंपनी यांच्याकडून कोणतीही नुकसान भरपाई घेतलेली नाही असा युक्तिवाद अर्जदारांनी केलेला आहे. त्यामुळे सामने वाला यांचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक नाही.

४६) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने प्रस्तुच्या मुद्द्यांवर निष्कर्ष नोंदवून खालील प्रमाणे आदेश करण्यात येतात –

## आदेश

१) मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. २१८/२०२१ खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

२) सामनेवाला क्र. २ यांनी अर्जदारांना नादोष नुकसान भरपाईच्या रकमेसह मोटार अपघात नुकसान भरपाई रक्कम रुपये १२,४४,०००/— (रक्कम रुपय बारा लाख चौरेचाळीस हजार मात्र) अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसूल होईपावेतो सदर रकमेवर दर साल दर शेकडा सात टक्के व्याजासह अदा करावी.

३) सामनेवाला क्र. २ यांनी नुकसान भरपाईची रक्कम या न्यायाधिकरणाच्या खालील बँक खात्यात जमा करावी व त्याबाबत खाली नमूद ई–मेलवर न्यायाधिकरणास कळवावे

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नाव | : | भारतीय स्टेट बँक. |
| शाखा | : | मलकापूर, जिल्हा बुलढाणा. |
| खाते क्रमांक | : | 40786745622. |
| आय.एफ.एस.सी. कोड | : | SBIN0000419. |
| ईमेल | : | mahbulmalsc@aij.gov.in |

४) नुकसान भरपाई रकमेपैकी प्रत्येकी ५०% रक्कम अर्जदार क्र. १ व २ यांना देण्यात यावी.

५) अर्जदारांनी नियमाप्रमाणे उर्वरित मुद्रांक शुल्क १५ दिवसाच्या आत न्यायालयात सादर करावे.

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

६) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅनकार्ड बद्दल माहिती, ई–मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत न्यायाधिकरणास सादर करावी.

७) अर्जदारांनी उर्वरित मुद्रांक शुल्क सादर केल्यानंतर अवार्ड करण्यात यावा.

८) येणेप्रमाणे अर्ज निकाली केला असे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PURUSHOTTAM BHAURAO JADHAV
Date: 2026.04.08 16:23:54 +0530

मलकापूर.
दिनांक – ०८/०४/२०२६.

**(पुरुषोत्तम भा. जाधव)**
सदस्य,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मलकापूर.

– – – – –

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करते की, या न्यायनिर्णयाची अपलोड केलेली पी.डी.एफ. फाइल ही मूळ स्वाक्षरी केलेल्या न्यायनिर्णयानुसार खरी आणि बरोबर प्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | मोटार अपघात दावा न्यायाधिकारण, मलकापूर. |
| लघुलेखिकेचे नांव | :- | कु. एच.डी. चौधरी, लघुलेखक श्रेणी-१ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :- | ०८/०४/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०८/०४/२०२६. |